**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**
Online ISSN 2278-8808, SJIF 2024 = 8.153
https://www.srjis.com/issues_data/234
Peer Reviewed & Refereed Journal, MAY-JUNE 2024, Vol- 13/83

# महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सार्वत्रिक निवडणूक दरम्यान पोलीस प्रशासनावर येणारा ताण : विशेष संदर्भ औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) जिल्हा

**दिपाली भास्कर भोजने**

*संशोधक, एम.फिल लोकप्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर*

*ईमेलः dipalibhojane94@gmail.com*

**डॉ. सतीश दांडगे**

*मार्गदर्शक, प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर*

*ईमेलः satishdandge.ajanta@gmail.com*

**Paper Received On**: 20 May 2024

**Peer Reviewed On**: 24 June 2024

**Published On:** 01 July 2024

***Abstract***

*प्रस्तुत संशोधन अभ्यासामध्ये महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सार्वत्रिक निवडणूक दरम्यान पोलीस प्रशासनावर येणारा ताण : विशेष संदर्भ औरंगाबाद जिल्हा'' या संशोधन विषयावर अभ्यास करण्यात आला आहे.*

*संशोधनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संशोधकाने सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेदरम्यान पोलीस प्रशासनावर येणा-या ताण-तणावाचे स्वरूप आणि कारणे इ. आंतरप्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी शंभर प्रश्नावली तयार केली. औरंगाबाद जिल्ह्यातील शहरी भागातील अठरा पोलीस स्टेशन मधील निवडणुकीचा बंदोबस्त केलेल्या सहा अनुभवी पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांच्याकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली.*

*प्रत्येक पोलीस स्टेशनमधील एकूण शंभर अनुभव संपन्न पोलिसांचे प्रश्नावली व मुलाखतीच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात आले. प्राप्त माहितीच्या विश्लेषणासाठी प्रस्तुत संशोधन विषयात सांख्यिकीय तंत्राचा वापर केला असून तक्ता सारणी, टक्केवारी इ. या संख्याशास्त्रीय साधनांच्या साहाय्याने उपस्थित केलेल्या प्रश्नांचे विश्लेषण करण्यात आले.*

*संशोधनाच्या निष्कर्षातून असे दिसून आले की, कामाचा प्रचंड भार आणि मनुष्यबळाचा अभाव, निवडणुकीच्या काळात जास्त कालावधीपर्यंत बंदोबस्त करावा लागतो. त्या दरम्यान पोलीस प्रशासनाला अनेक समस्यातून सामोरे जावे लागते. यामुळे पोलीस प्रशासनावर असलेला ताण-तणाव स्पष्टपणे दिसून येतो.*

***Keyword*:** *सार्वत्रिक निवडणुका, पोलीस प्रशासन, ताण-तणाव, सर्वेक्षण, उपाययोजना*

## प्रस्तावना :

निवडणुका हा लोकशाहीचा कणा आहे. अशा देशात शांततेत पार पाडणा-या निवडणुका आणि त्यातील पारदर्शकता निष्पक्षता कायम राहत असल्यास लोकशाही परिपक्व होत असल्याचे ते एक निदर्शक मानले जाते. अर्थात निवडणुकांना वगळून लोकशाही व्यवस्थेची कल्पना केली जाऊ शकत नाही. त्यामुळे जगात ज्या काही प्रमुख राष्ट्रांमध्ये लोकशाही व्यवस्था कार्यान्वित आहे. तिथे निवडणुकाचे केले जाणारे व्यवस्थापन व नियमितता यात आजवर पोलीस प्रशासनाची भूमिका खूप महत्त्वपूर्ण राहिली

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

आहे. भारतात देखील निवडणुका लोकशाहीच्या परिपक्वतेसाठी आवश्यक आहेत. या निवडणुका चांगल्या होण्यासाठी निःपक्ष, काटेकोर, कायदा-सुव्यवस्था राखून पोलीस प्रशासन काम करते. या दृष्टीकोनातून **महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या दरम्यान पोलीस प्रशासनावर येणारा ताण** कमी करण्यासाठी उपाय शोधणे हा संशोधनाचा केंद्रबिंदू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या दरम्यान पोलिसांना सतत बंदोबस्त करावा लागतो. त्या परिस्थितीत मनुष्यबळाचा अभाव असेल तर पोलिसांना २४ तासांपेक्षा अधिक काळ ड्युटी करावी लागते. कारण पोलीस आपल्या सेवा क्षेत्राशी कायम बांधील असल्यामुळे त्यांना केव्हाही पाचारण करण्यात येते. हव्या त्या प्रसंगी घटनास्थळी पोलीस त्वरित पोहचतात.

स्थानिक स्तरावरील सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया दरम्यान पोलीस प्रशासन आपली महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात. आदर्श आचारसंहिता नियमावली लागू झाल्यावर जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडून आलेल्या आदेशाप्रमाणे मा. पोलीस आयुक्त यांनी केलेल्या सुचनांचे पालन करतात. निवडणूक काळात पोलीस कर्मचारी पेट्रोलिंग करतात. मोहल्ला मिटींग घेतात. राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांना नियम व अटीबाबत सूचना देतात. नियमांचे उल्लंघन होणार नाही याबाबत नियंत्रण ठेवतात. गरज असेल तर गुन्हा दाखल करतात. आचारसंहिता नियमावलीचे उल्लंघन होऊ नये यासाठी सी.आर.पी.सी. १४९ प्रमाणे उमेदवारांना नोटीस देतात. निवडणूक क्षेत्रांमध्ये संवेदनशील बुथ कॅप्चरच्या ठिकाणी पोलिसांचा स्ट्राँग बंदोबस्त नेमण्यात येतो. कारण त्यास संवेदनशील मतदान केंद्र म्हणून घोषित केल्या जाते. या अतिसंवेदनशील मतदान केंद्राबाहेर व्हिडीओ कॅमेरा लावलेला असतो. पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचारी बारीक-सारीक गोष्टीवर लक्ष ठेवतात. ही ताण-तणावाची परिस्थिती पोलीस प्रशासन अत्यंत शांततेने संयम ठेवून व्यवस्थितरित्या हाताळतात. सार्वत्रिक निवडणूक दरम्यान पोलिसांना अनेक समस्या आव्हानांना तोंड द्यावे लागते.

त्यामुळे अनेक गोष्टींचा ताण-तणाव पोलिसांना येतो. सार्वत्रिक निवडणुकीचा बंदोबस्त करण्यासाठी मनुष्यबळाची सतत कमतरता भासते. मतदान संपेपर्यंत सलग काळ बंदोबस्त पोलिसांना करावा लागतो. काही राजकीय नेते दबाव व हस्तक्षेप करून पोलिसांच्या कार्यात अडथळा आणतात. त्याचबरोबर निवडणूक पारदर्शकतेने पार पाडणे व कायदा-सुव्यवस्था राखणे याचे प्रेशर वरिष्ठ अधिका-यांचे पोलिस कर्मचा-यांवर असते. निवडणुकीचा बंदोबस्त व इतर कामांचा बंदोबस्त यात सतत व्यस्त असल्याने पोलिसांचे आरोग्यावर नेहमी दुर्लक्ष होते. त्यामुळे पोलिसांना अनेक आजार जडतात.

उच्च रक्तदाब, निद्रानाश, हृदयाच्या समस्या, शुगर, पाठीचे आजार इ. आजारांचे प्रमाण वाढलेले दिसून येते. पोलीस प्रशासनातील ताण कमी करण्यासाठी उपाय शोधणे हे संशोधनाचे उद्दिष्टे आहे. प्रत्यक्ष मुलाखत, प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राप्त केलेल्या माहितीचा सविस्तर अभ्यास या शोधनिबंधात केलेला आहे. प्राप्त माहितीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. सार्वत्रिक निवडणूक दरम्यान पोलीस प्रशासनावरील ताण कमी करण्यासाठी उपाय सुचविले आहे.

**➲ संशोधनाचे महत्त्व व गरज :**

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन ही महत्त्वाची यंत्रणा आहे. निवडणूक ही संवेदनशील प्रक्रिया असून कायदा व सुव्यवस्था राखणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. हे संशोधन निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आणि पोलीस विभागातील तणाव कमी करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

➲ **समस्या सूत्रण :**

प्रस्तुत संशोधन कार्य **''महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सार्वत्रिक निवडणूक दरम्यान पोलीस प्रशासनावर येणारा ताण : विशेष संदर्भ औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) जिल्हा''** यावर संबंधित आहे. स्थानिक स्वशासनात सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया कशी असते? स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये निवडणूक प्रक्रियेच्या दरम्यान पोलीस प्रशासनाची भूमिका काय असते? त्या दरम्यान मनुष्यबळ अपुरे पडते का? तसेच सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेदरम्यान पोलीस प्रशासनावर येणा-या ताण-तणावाचे स्वरूप आणि कारणे काय आहेत? इ. आंतरप्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने हा विषय निवडला आहे. त्यावर उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न या संशोधन कार्यात केला आहे.

➲ **संशोधनाची उद्दिष्टे :**

१. स्थानिक प्रशासनात सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रक्रियेचे पुर्वनिरीक्षण करणे; विशेषतः पोलीस प्रशासनासह विविध यंत्रणाची भूमिका अभ्यासणे.

२. विशेषतः सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी पोलीस खात्यातील अपु-या मनुष्यबळाचा अभ्यास करणे.

३. सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेदरम्यान पोलीस खात्यावरील ताणाचे स्वरूप शोधणे आणि त्यावर उपाय शोधणे.

४. औरंगाबाद मधील पोलीस कर्मचा-यांना निवडणूक दरम्यान येणा-या समस्यांचा अभ्यास करणे.

➲ **संशोधनाची गृहितके :**

१. स्थानिक प्रशासनातील सार्वत्रिक निवडणुकीच्या यशस्वी व्यवस्थापनात पोलीस प्रशासनाची भूमिका महत्त्वाची असते.

२. कामाचा प्रचंड भार आणि मनुष्यबळाचा अभाव यामुळे पोलीस प्रशासनावर ताण येतो.

३. सार्वत्रिक निवडणूक दरम्यान ड्युटी करताना पोलीस कर्मचा-यांवर वरिष्ठ अधिका-यांचा सतत दबाव असतो.

४. सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात पोलीस कर्मचा-यांना आवश्यक असणा-या सोई-सुविधा पुरविल्या जात नाही. याचा परिणाम त्यांच्या कार्यक्षमतेवर होतो.

५. औरंगाबाद मधील पोलीस कर्मचा-यांना निवडणुकीच्या दरम्यान अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

➲ **संशोधन पद्धती :**

संशोधनामध्ये संशोधन पद्धती हा महत्त्वाचा भाग असतो. त्यासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धती वापरण्यात आल्या आहेत. ह्या संशोधनात प्राथमिक आणि दुय्यम साधन सामग्रीचा देखील वापर करण्यात आला आहे.

➲ **तथ्य संकलन :**

प्रस्तुत विषयाची माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधन सामग्रीचा देखील वापर करण्यात आला आहे.

**१. प्राथमिक स्त्रोत :**

प्राथमिक माहितीचे संकलन हे प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण व सर्वेक्षणाच्या माध्यमातून तथ्य संकलित करण्यात आले आहेत.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**२. दुय्यम स्त्रोत :**

द्वितीय तथ्य सामग्रीत प्रकाशित किंवा अप्रकाशित दस्तऐवज जे वेबसाईटच्या माध्यमातून उपलब्ध झाले आहे. तसेच शासनाचा अहवाल, प्रकाशने, संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे, संकेतस्थळाचा वापर तथ्य संकलनासाठी करण्यात आला आहे.

➲ **सांख्यिकीय तंत्र :**

प्रस्तुत संशोधन विषयामध्ये सांख्यिकीय तंत्राचा वापर केला असून तक्ता सारणी, सरासरी, टक्केवारी इ. करण्यात आला आहे.

➲ **नमुना निवड :**

संशोधनामध्ये नमुना निवडीला विशेष महत्त्व असते. प्रस्तुत संशोधनामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील शहरी भागातील अठरा पोलीस स्टेशनची निवड करण्यात आली आहे. यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या पोलीस स्टेशनमधील वरिष्ठ पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी ज्यांना या सेवा क्षेत्रात नोकरी करून २० ते २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांनी अनेक वेळा औरंगाबाद जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागात होणा-या सार्वत्रिक निवडणुकीचा बंदोबस्त केला आहे. अशा अनुभवी पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचा-यांची निवड सदर संशोधनासाठी केली आहे.

**स्थानिक निवडणूक प्रक्रिया दरम्यान पोलीस प्रशासनाची भूमिका व तणाव :**

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी पोलीस यंत्रणेमार्फत आवश्यक कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने सर्व प्रकारची दक्षता घेतली जाते. आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात. कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलीस कर्मचारी या कालावधीत नाकाबंदी, अवैध शस्त्र जप्ती, रोकड जप्ती इ. स्वरूपाची कार्यवाही करतात. त्यामुळे सार्वत्रिक निवडणुका शांतता व सुरळीतपणे पार पाडण्यास मदत होते. या स्थानिक स्तरावरील निवडणूक प्रक्रिया सुरू होण्यापासून ते समाप्तीपर्यंत पोलीस प्रशासन आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

निवडणुकांची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यावर या आचारसंहितेची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी आणि पोलीस आयुक्त हे बैठक घेतात. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांचे पालन करून योग्य ती जबाबदारी पेलण्यासाठी पोलीस आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकारी हे चर्चा विनीमय करून निवडणूक व्यवस्थित पार पाडण्याचे आदेश देतात. या आदेशाचे पालन वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचारी करतात. पोलीस प्रशासन तब्बल चार महिने निवडणूक बंदोबस्त करतात. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका ह्या ग्रामीण व शहरी दोन्ही भागात घेतल्या जातात. दोन्ही भागात पोलिसांना बंदोबस्तासाठी पाठविले जाते. ग्रामीण व शहरी पातळीवर घेतल्या जाणा-या निवडणुकीच्या प्रक्रियादरम्यान पोलीस कर्मचारी आपली महत्त्वपूर्ण भूमिका पार पडतात.

प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष बंदोबस्ताचे कामे, प्रचार सभाचा बंदोबस्त व्हीआयपी नेत्यांचा सुरक्षा बंदोबस्त, मतदानाच्या दिवशीचा बंदोबस्त, मतमोजणीच्या ठिकाणचा बंदोबस्त करतात. संवेदनशील भागात गस्त घालतात. संवेदनशील मतदान केंद्रावर पोलीस कर्मचारी सज्ज राहून आपली चोख भूमिका पार पाडतात. संवेदनशील मतदान केंद्राच्या ठिकाणी पोलीस व्हिडीओ रेकॉर्डिंग करतात. त्यांच्या मदतीला होमगार्ड एस.आरपी.एफ., क्युआरटी आणि आरसीपीची पथके नमेले जातात. निवडणूक आयोगाचे भरारी पथक आणि नाकाबंदी करिता पोलिसांची खास पथके तैनात केले जातात. बेकायदेशीर वस्तूंची तस्करी होऊ नये यावर

Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

पोलीस कर्मचारी करडी नजर ठेवतात. जिल्हा परिषद, ग्राम पंचायत, नगर पंचायत येथे मतदान केंद्र उभारतात व तेथे संरक्षित बॅरीकेटस लावले जातात.

अतिसंवेदनशील मतदान केंद्राच्या भोवती गुन्हेशाखाचे आणि विशेष शाखेचे पोलीस साध्या वेशात तैनात असतात. तसेच सुक्ष्मनिरीक्षक लक्ष ठेवतात. नागरिकांना मुक्त वातावरणात मतदान करता यावे यासाठी त्यांच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी पथ संचलन करण्यात येते. पोलीस व होमगार्ड यांना पोस्टल मतदानाची सोय उपलब्ध करून दिली जाते. कायदा-सुव्यवस्था राखून पोलीस आपली महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात.

सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया दरम्यान प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी पोलीस प्रशासनातील पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचारी मतदान केंद्राच्या प्रवेशद्वारावर सदैव तैनात असतात. पोलीस कर्मचारी मतदान केंद्राच्या सुरक्षिततेसाठी अनेक कर्तव्य व जबाबदा-या पार पाडतात.

मतदान केंद्राच्या आतील बाजूस काही शंकास्पद व्यवहार निदर्शनास आल्यास केंद्राध्यक्ष निरीक्षकास पोलीस कर्मचारी माहिती कळवितात. मतदान केंद्राबाहेर गडबड गोंधळ, हिंसा, हाणामारी व दंगा सुरू असल्यास मतदान केंद्रास संरक्षण पुरविण्यासाठी सुरक्षा रक्षकाची पोलीस कर्मचारी  मदत घेतात. मतदान केंद्राच्या १०० मीटर आतपर्यंत राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना प्रवेश दिला जात नाही, मतदान प्रक्रिया व्यवस्थित पार पाडण्यासाठी पोलीस कर्मचारी मतदारांना एका रांगेत उभे करतात. मतदान प्रक्रिया सुरू असतांना एकाच वेळी एकाच मतदाराला मतदान करण्यासाठी आत पाठवतात. मतदान केंद्रावर छुपा प्रचार होणार नाही. यासंबंधी दक्षता पोलीस प्रशासन घेते. मतदान प्रक्रिया संपल्यानंतर मतदान यंत्र व व्ही.व्ही. पीएटी मशीन ही मतदान केंद्रातील अधिकारी व कर्मचा-यांना  सर्व साहित्य जमा करेपर्यंत सुरक्षा पुरवितात.

एकंदरीत निवडणूक सुरू होण्यापासून ती संपेपर्यत पोलीस प्रशासन आपली चोख भूमिका पार पाडतात. निवडणूक दरम्यान सतत कार्यरत असतांना पोलीस प्रशासनावर प्रचंड ताण-तणाव येतो. महानगरपालिकेच्या निवडणूक दरम्यान जिल्ह्यातील राजकारणांची रस्सीखेच-वर्चस्वाची लढाई सुरू असते. पक्षा-पक्षांतर्गत मतभेद, आपापसातील हेवेदावे यामुळे अनेक वाद टोकाच्या परिस्थितीवर येऊन ठेपलेले असतात. राजकारणाच्या वादात सक्रीयपणे उडी घेणारे कार्यकर्ते शहराच्या शांततेला गालबोट लावतात. त्यामुळे कायदा-सुव्यवस्था धोक्यात येते. यामुळे पोलिसांना प्रचंड ताण येतो काही पक्षाचे वाद, गटातटाचे राजकारण हे शत्रुत्त्व प्रवृत्तीत बदललेले असतात. आजी-माजी मंत्री दिग्गज राजकारणी नेते यांच्याशी वाद न घातला जातीय सलोखा टिकविण्याचे दिव्य पार पाडण्याचा गहन प्रश्न पोलिसांसमोर उभा राहतो. ही आव्हाने पेलतांना पोलिसांना अधिक ताण-तणाव असल्याचा दिसून येतो. आंतरराष्ट्रीय दहशतवाद, संघटित गुन्हेगारी, टोळीयुध्द, अतिरेकी संघटना या गोष्टीही कायदा-सुव्यवस्थेत प्रचंड अडथळा निर्माण करतात.  याचा बंदोबस्त पोलीस प्रशासन करते या बंदोबस्ताचे नियोजन करतांना पोलिसांची दमछाक होते. याचा देखील प्रचंड ताण येतो. तरीही पोलिस प्रशासन काटेकोर नियमाचे पालन करून समाजात कायदा-सुव्यवस्था कायम अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करतात.

वरील परिस्थितीची व्याप्ती  लक्षात घेता पोलिसांवर कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नांमुळे प्रचंड ताण-तणाव व मानसिक दडपण येत असल्याचे दिसून येते.

केंद्रीयमंत्री, गृहमंत्री, मुख्यमंत्री, व्हीआयपी नेत्याच्या दौ-यावेळी सुरक्षेसाठी पोलिसांना घटनास्थळी किमान तीन तास आधी बंदोबस्तासाठी तैनात केले जाते. सभा व संपूर्ण नेत्याचे प्रस्थान होईपर्यंत त्या ठिकाणाहून न हलण्याचे आदेश असल्याने

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

पोलीस कर्मचारी तासन्-तास उन्हात उभे राहतात. काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय व जेवणाची सोय देखील उपलब्ध नसते. सतत ड्युटी केल्यामुळे पोलिसांना प्रचंड ताण-तणाव येतो. हे प्रकर्षाने दिसून येते.

या व्यतिरिक्त देखील अनेक कामाचा ताण पोलिसांना येतो. गुन्हेगारांचा पाठलाग करणे, खुनाचा तपास करणे, खुनाचा आरोपी मिळेपर्यंत पोलीस तहान, भुक, झोप सर्व विसरून केसचा निकाल लावतात, तसेच पोलीस स्टेशनमध्ये येणा-या तक्रारी, गुन्हा, चोरी यांचा तपास करणे, महिलासंबंधी, बालकामगार संबंधी गुन्हे यांचा तपास करणे, चोरी, दरोडा, अपघात या सर्वांचा तपास करणे, Pso-Do असणे, बीट मार्शल प्रत्येक भागातील परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी पोलीस कर्मचा-यांना बीट देण्यात आले आहे. पेट्रोलिंग, रात्रीची गस्त घालणे, शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे. तसेच रॅली, मोर्चा, उपोषणे, दंगली, आंदोलने यांचा बंदोबस्त पोलीस प्रशासन करते. ही सर्व ड्युतीतील अनेक कर्तव्ये पोलीस प्रशासनातील पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचारी पार पाडतात.

ही कार्ये पार पाडतांना पोलिसांना अधिक ताण- तणाव असल्याचा दिसून येतो. या व्यतिरिक्त पोलिसांना राजकीय दबाव- हस्तक्षेप, वरिष्ठ अधिका-यांचा दबाव आणि कायदा- सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अपुरे मनुष्यबळ असणे, अपुरे वेतन मिळणे, शासकीय निवासस्थानाची समस्या, मिळणा-या अपु-या सुट्या यामुळे देखील पोलिसांना प्रचंड ताण-तणाव येतो. त्याचबरोबर व्यसनाचा विळखा त्यातून उद्भवणारे आजार कौटुबिंक टेंशन या परिस्थितीमुळे पोलिसांची कोंडी होते. त्यांचा चिडचिडेपणा वाढतो, नैराश्य वाढते. अवेळी जेवण करणे, असंतुलित आहार, दारू, तंबाखू, सिगारेट ही व्यसने करणे यामुळे पोलिसांमध्ये लठ्ठपणा वाढत आहे. या लठ्ठपणामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह, हार्टअटॅक, पाठदुखी, निद्रानाश, संप्रेरकांची पातळी वाढते, मृत्यूचे वाढते प्रमाण, आत्महत्या या कारणांमुळे पोलिसांचे नैराश्य वाढते, अनेक आजारांमुळे देखील ताण- तणावाचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

**औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) जिल्हा पोलीस प्रशासनावरील तणावाचे सर्वेक्षण**

औरंगाबाद जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमधील दहा पोलीस कर्मचा-यांची निवड करून त्यांना मुलाखत अनुसूची देण्यात आली. या दहामध्ये ज्यांनी निवडणुकीचा ड्युटी बंदोबस्त केला आहे. त्यांनी अनेक वेळा निवडणुकीच्या दरम्यान जो अनुभव घेतला आहे. अशा पोलिसांकडून ही मुलाखत अनुसूची भरून घेण्यात आली. या दहामध्ये पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस कॉन्स्टेबल, पोलीस शिपाई यांचा समावेश होता. या पोलीस कर्मचारी वर्गांना निवडणुकीचा अनुभव असल्यामुळे त्या दरम्यान अनेक समस्या, संकटाना समोरे गेले आहेत.

पोलिसांनी बाहेरगावी निवडणूक बंदोबस्त अनेक वेळा केला आहे. निवडणूक असलेल्या ठिकाणी सोई-सुविधांचा अभाव, जेवण उपलब्ध नसणे, झोपेसाठी जागा नसणे, वैद्यकीय सुविधांचा अभाव असणे या सर्व गोष्टींमुळे येणारा ताण-तणाव याविषयी अनुभव पोलिसांनी प्रश्नावली व मुलाखतीच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. या संकलित माहितीचे विश्लेषण तक्ता सारणीद्वारे मांडणी केली आहे. त्याद्वारे प्राप्त तथ्यांचे व विविध समस्यांचे शास्त्रीय पध्दतीने वर्गीकरण करण्यात येऊन तथ्यांचे सविस्तर विश्लेषण खालील प्रमाणे आहे.

**१. पोलीस कर्मचा-यांचा कुटुंबासोबतचा सहवास** :

पोलीस प्रशासनात चोवीस तास बांधील असल्यामुळे पोलिसांना त्यांच्या नोकरीमुळे आपल्या कुटुंबाला पुरेसा वेळ देता येत नाही. याचा प्रतिकूल परिणाम त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती आई-वडील, पत्नी-मुले, बहिण-भाऊ या सदस्यावर होतो. तर तुम्ही

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

कुटुंबाला पुरेसा वेळ देता का? या अनुषंगाने संबंधित माहिती जाणून घेण्यासाठी सदरील प्रश्न संशोधकाने उपस्थित केला आहे. खालील तक्त्या आधारे त्याचे स्पष्टीकरण करता येईल.

**तक्ता.क्र. १**

**पोलीस कर्मचा-यांचा कुटुंबासोबतचा सहवास**

| अ.क्र | प्रतिसाद | पोलीस संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ६ | ३ |
| २ | नाही | ४८ | २४ |
| ३ | कधी-कधी | ४६ | २३ |
| ४ | नेहमी | - | - |
| | **एकूण** | **१००** | **५०** |

**स्त्रोत : प्राथमिक माहितीचे संकलन**

**२. जास्त वेळ कर्तव्यावर असण्याचा कुटुंबावर परिणाम**

औरंगाबाद जिल्ह्यातील पोलीस प्रशासनातील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी या सेवा क्षेत्रात सतत कार्यरत असल्यामुळे त्यांना केव्हाही पाचारण करण्यात येते. दैनंदिन ड्युटी करण्याबरोबर इतर कामाचा अतिरिक्त कार्यभार पेलावा लागतो. तसेच निवडणुकीचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांना बाहेरगावी पाठविले जाते. तेथे पोलिसांना बाहेरगावी निवडणुकीच्या बंदोबस्तासाठी दोन ते तीन दिवस मुक्कामी थांबावे लागते. पोलिसांचा जास्त वेळ कर्तव्यावर असण्याचा परिणाम कुटुंबावर होतो. तर निवडणूक काळात पोलिसांना बंदोबस्तासाठी बाहेरगावी पाठविले जाते. त्या दरम्यान अनेक कर्तव्ये बजावण्यासाठी सतत ड्युटीमध्ये तत्पर राहावे लागते.

**तक्ता क्र. २**

**जास्त वेळ कर्तव्यावर असण्याचा कुटुंबावर परिणाम**

| अ.क्र | प्रतिसाद | पोलीस संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४८ | २४ |
| २ | नाही | २४ | १२ |
| ३ | निश्चित सांगता येत नाही | २८ | १४ |
| | **एकूण** | **१००** | **५०** |

**स्त्रोत : प्राथमिक माहितीचे संकलन**

**३. आरोग्यविषयक शिबीरे**

पोलीस प्रशासनातील अनेक अनपेक्षित समस्यांमुळे आव्हानामुळे पोलिसांना शारीरिक व मानसिक आजार उद्भवत आहेत. पूर्वीच्या तुलनेत माणसाचे जीवनमान आहार यामध्येही बदल झाला आहे. आजाराचे स्वरूपही बदलत आहे. प्रत्येक दिवशी नवीन घटना प्रसंगाना सामोरे जातांना पोलिसांना प्रचंड ताण-तणाव येतो. शारीरिक व मानसिक स्वास्थ्य नीट राहत नाही. तो वर कार्यक्षमतेने काम करता येत नाही. म्हणून पोलिसांवरील ताण-तणाव कमी करणे आवश्यक आहे. त्यासाठी दरवर्षी शिबीरे, योगासन, प्राणायम यासारखे कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक असते.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**तक्ता क्र. ३**

**आरोग्यविषयक शिबीरे**

| अ.क्र | प्रतिसाद | पोलीस संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३६ | १८ |
| २ | नाही | २३ | ११.५ |
| ३ | कधी-कधी | ४१ | २०.५ |
| ४ | नेहमी | - | - |
| | **एकूण** | **१००** | **५०** |

**स्त्रोत : प्राथमिक माहितीचे संकलन**

**४. ताण-तणाव कमी करण्यासाठी मार्गदर्शनपर समुपदेशन उपक्रमः**

पोलीस प्रशासनात कार्यरत असणारे पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचारी सतत ड्युटी करत असतांना त्या दरम्यान अनेक समस्या, संकटाला पोलिसांना सामोरे जावे लागते. त्याचबरोबर ड्युटी करतांना सतत वरिष्ठ अधिका-यांचा दबाव असतो. पोलिसांच्या कामकाजात अडथळा आणणा-या राजकीय नेत्यांचा देखील दबाव असतो. तसेच पोलिसांना कौटुंबिक टेंशन देखील असते. पोलीस या तणावाने त्रस्त असतात हा ताण-तणाव कमी करण्यासाठी पोलिसांकरिता मार्गदर्शन समुपदेशनाची नितांत गरज असल्याची दिसून येते, पोलिसांवरील ताण-तणाव कमी करण्यासाठी मार्गदर्शनपर समुपदेशन आवश्यक असते.

**तक्ता क्र. ४**

**ताण-तणाव कमी करण्यासाठी मार्गदर्शनपर समुपदेशन उपक्रम**

| अ.क्र | प्रतिसाद | पोलीस संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २० | १० |
| २ | नाही | ५३ | २६.५ |
| ३ | कधी-कधी | १२ | ६ |
| ४ | क्वचित | १५ | ७.५ |
| | **एकूण** | **१००** | **५०** |

**स्त्रोत : प्राथमिक माहितीचे संकलन**

**५. वरिष्ठ अधिका-यांचा सतत असणारा दबावः**

प्रशासनात कार्य करत असतांना अधिकारपद परंपरेनुसार वरिष्ठ हा कनिष्ठाला आदेश देत असतो. हे वरिष्ठ अधिकारी कायद्याचे काटेकोर पालन व्हावे नियमांचे उल्लंघन होऊ नये यासाठी नेहमी तत्पर असतात. आणि आपल्या कनिष्ठाकडून कायद्याची योग्यरित्या अमंलबजावणी करवून घेण्यासाठी त्यांना सतत आवश्यक ते आदेश देत असतात. आणि कनिष्ठ वर्गांकडून कार्य व्यवस्थितरित्या पार पाडून घेतात.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**तक्ता क्र. ५**

**वरिष्ठ अधिका-यांचा सतत असणारा दबाव**

| अ.क्र | प्रतिसाद | पोलीस संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४४ | २२ |
| २ | नाही | ०७ | ३.५ |
| ३ | कधी-कधी | २० | १० |
| ४ | नेहमी | १६ | ८ |
| | **एकूण** | **१००** | **५०** |

**स्त्रोत : प्राथमिक माहितीचे संकलन**

**निष्कर्ष :**

१. लोकसभा व विधानसभा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या काळामध्ये पोलीस बंदोबस्त करतांना स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रामध्ये मनुष्यबळ कमी पडते.

२. निवडणुकीच्या काळामध्ये होणा-या प्रचारसभा, पदयात्रा, शक्ती प्रदर्शन, रॅली, मिरवणूका, व्ही.आय.पी. नेत्यांचा बंदोबस्त या संदर्भामध्ये निवडणुकीच्या काळात मोठ्या प्रमाणात पोलिसांचा बंदोबस्त ठेवावा लागतो.

३. औरंगाबाद जिल्ह्यात पोलिसांची संख्या अत्यंत कमी आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या दरम्यान बंदोबस्त करण्याठी व इतर कामांची ड्युटी करण्यासाठी मनुष्यबळाची सतत कमतरता भासते.

४. सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात पोलीस कर्मचा-यांना आवश्यक असणा-या सुविधा चहा, नाश्ता जेवण, पिण्याचे पाणी, राहण्याची व्यवस्था इ. आवश्यक सुविधा पुरविल्या जात नाहीत याचा परिणाम त्यांच्या कार्यक्षमतेवर होतो.

५. पोलीस प्रशासनात चोवीस तास बांधील असलेल्या पोलिसांना त्यांच्या नोकरीमुळे आपल्या कुटुंबाला पुरेसा वेळ देता येत नाही. याचा प्रतिकूल परिणाम कुटुंबातील सदस्यावर होतो.

६. या सेवा क्षेत्रात कार्यरत असणारे पोलीस कर्मचारी अनेक कर्तव्य पार पाडण्यात व्यस्त असल्यामुळे अवेळी जेवण करणे, पुरेशी झोप न घेणे त्यामुळे पोलिसांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतो. एकंदरीत कर्तव्यावर जास्त काळ राहिल्यामुळे पोलिसांचे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते.

७. या सेवा क्षेत्रातील कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचा-यांना दैनंदिन ड्युटीमध्ये कामे करतांना दिवसभरामध्ये जो शारीरिक व मानसिक थकवा येतो तो दुर करण्यासाठी शारीरिक व मानसिक व्यायाम करण्यासाठी नियमित वेळ काढणे शक्य होत नाही. त्यामुळे पोलिसांच्या शारीरिक क्षमता कमी होते व मानसिकतेवर देखील परिणाम होतो.

८. पोलिसांना निवडणूक काळात प्रचार सभा, रॅली, मोर्चा, आंदोलने यांचा बंदोबस्त करण्याचा निधी, मानधन (भत्ता) दिला जात नाही.

९. निवडणूक काळात बंदोबस्ताच्या ठिकाणी मुलभूत सुविधांचा अभाव असतो. याचा देखील ताण-तणाव पोलिसांना असल्याचा दिसून येतो.

१०. सार्वत्रिक निवडणूक दरम्यान बंदोबस्त करतांना पोलीस कर्मचा-यांवर वरिष्ठ अधिका-यांचा सतत दबाव असतो. त्यामुळे पोलीस कर्मचारी तणावाखाली असलेले दिसून येतात.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**उपाययोजना :**

१. औरंगाबाद जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रक्रिया दरम्यान बंदोबस्त करण्यासाठी मनुष्यबळाची कमतरता भासु नये म्हणून एन.सी.सी. चे विद्यार्थी स्काऊट गाईडचे विद्यार्थी, विशेष पोलीस मित्र, सेवा निवृत्त धारकांची मदत शासनाने घेतली पाहीजे तसेच पोलिसांची नियमित भरती शासनाकडून केली गेली पाहिजे.

२. निवडणूक काळात प्रचार सभा, पदयात्रा, शक्ती प्रदर्शन, मिरवणुका, रॅली, व्ही आय.पी. नेत्यांचा बंदोबस्त असणा-या ठिकाणी पोलिसांची कार्यक्षमता टिकून राहण्यासाठी आवश्यक सुविधा शासनाने उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

३. पोलीस कर्मचा-यांना सार्वत्रिक निवडणुकीचा बंदोबस्त करण्याचा प्रतिदिन भत्ता अत्यंत कमी स्वरूपाचा मिळतो. तर पुरेसा निधी, मानधन (भत्ता) शासनाने दिला पाहिजे. जेणेकरून पोलीस कर्मचारी उत्साहाने आपले कर्तव्य बजावतील.

४. निवडणूक काळात पोलिसांकरिता बंदोबस्ताच्या ठिकाणी मुलभूत सोई-सुविधा निवडणूक आयोगाने पुरविल्या पाहिजेत या तरतुदींची अंमलबजावणी केली पाहिजे.

५. निवडणुकीचा संपूर्ण कालावधी पाहता २४ तास पोलीस कर्मचारी सुरक्षा बंदोबस्त ठेवतात. तर संबंधित क्षेत्रातील सर्व पोलिसांना किमान आठ तासाच्या शिफ्टमध्ये बंदोबस्त देण्यात यावा. त्यामुळे शारीरिक व मानसिकदृष्ट्या पोलिस कर्मचारी कार्यक्षम राहण्यास मदत होईल.

६. निवडणूक काळातील होणा-या सभा, रॅली, मोर्चा, आंदोलने यांचा बंदोबस्त करण्याचा आर्थिक मोबदला (मानधन, निधी) पोलिसांना शासनाने दिला पाहिजे.

७. पोलिसांना आलेले नैराश्य या तणावग्रस्त वातावरणातून मोकळा श्वास घेता यावा यासाठी संतुलित आहार, निर्व्यसनी जीवन पध्दती, व्यायाम, योगधारणा, मानसिक स्वास्थ चांगले ठेवणे महत्वाचे आहे. मनाला शांती देणारे संगीत ऐकणे या चांगल्या सवयी जोपासण्यासाठी पोलिसांकरिता मार्गदर्शनपर समुपदेशन उपक्रम शासनाने आयोजित केले पाहिजेत.

८. पोलीस कर्मचारी या सेवा क्षेत्रात अहोरात्र कामे करतात. पण त्यांना दर महिन्याला मिळणारा पगार अत्यल्प स्वरूपाचा असून त्यांच्या पगारात (Sallary) शासनाने वाढ केली पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ**

*शिंदे दिलीप 'निवडणूक विषयक कायदे आणि प्रक्रिया*
*पोलीस मार्गदर्शिका पोलीस पाठ्यक्रम पुस्तिका प्रशिक्षण व खास पथके महाराष्ट्र राज्य मुंबई.*
*निवडणूक वार्ता राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र जुलै२०१७ अंक-२*
*दक्षता मासिक जानेवारी २०११*
*ताण-तणाव (लेख) महाराष्ट्र टाईम्स*
*निवडणूक बंदोबस्तावरील पोलिसांचे स्वास्थ बिघडले (लोकमत मराठी वर्तमानपत्र*
*औरंगाबाद जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०१२ आदर्श आचारसंहिता मार्गदर्शिका*

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*